नवी आशा नवी दिशा
सार्वमत

## महत्वाचे

# यशवंत स्टडी क्लबच्या ९ जणांची लिपिकपदी निवड

नेवासा (तालुका प्रतिनिधी) - येथील यशवंत स्टडी क्लबच्या ९ विद्यार्थ्यांची जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे कनिष्ठ लिपिकपदी निवड झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कमीत कमी खर्चात स्पर्धा परीक्षेचे उत्कृष्ट मार्गदर्शन मिळावे यासाठी सुरू केलेल्या यशवंत स्टडी क्लबच्या नऊ विद्यार्थ्यांची जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे कनिष्ठ लिपीकपदी निवड झाली आहे. बाळासाहेब रोडे, किरण दहिफळे, अविनाश कसबे, कैलास लोहकरे, हरीश दिवटे, राहुल बेल्हेकर, जावेद शेख, मयूर भोगे, आशा मस्के, अशी यशस्वी विद्यार्थ्यांची नावे आहेत. सन २०१७-१८ मध्ये यशवंत स्टडी क्लबने केंद्र व राज्य सरकारला पस्तीस वर्ग-२ व वर्ग-३ दर्जाचे उत्तम अधिकारी दिले आहेत.

1-